‘सरकार स्थापण्याच्या कार्यात सहभागी न होणा-या शहाण्या लोकांना,
वाईट लोकांनी बनविलेल्या सरकारखाली राहण्याची शिक्षा होत असते’
- **प्लेटो**

*i Watch*
**भारताच्या परिवर्तनासाठी** नागरिकांची चळवळ

मनुष्य स्त्रोत

उद्योग - व्यवसाय

अर्थव्यवस्था

# एका आर्थिक शक्तीत
# आणि एका प्रगत अशा राष्ट्रात
# भारताचे परिवर्तन

शिक्षण व प्रशिक्षण

नेतृत्व

शासन

“मी भारताचे संपूर्ण भ्रमण केल्यानंतर भारतातील एकही व्यक्ती गरिब किंवा चोर असल्याचे आढळले नाही. उच्च मूल्ये, उच्च गुणवत्तेचे लोक ही भारताची खरी संपत्ती आहे. जोपर्यंत या राष्ट्राची आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा असलेली पाळेमुळे आपण तोडणार नाही तोपर्यंत आपण हा देश जिंकू शकणार नाही; त्यामुळे मी असे सुचवितो की, या राष्ट्राची प्राचीन शिक्षणपध्दती व संस्कृती बदलायला हवी. असे केल्याने भारतीय असे मानतील की, विदेशी आणि इंग्रजी हे त्यांच्यापेक्षा वरचढ आहेत तसेच ते आपला आत्मसन्मान आणि स्व-संस्कृती विसरून ते आपल्याला हवे तसे बनतील. म्हणजेच एक संपूर्ण पराधीन देश.”

- लॉर्ड मेकॉली यांच्या २ फेब्रुवारी १८३५ या दिवशीच्या ब्रिटीश पार्लमेंटमधील भाषणातून.

## **भारताच्या ३५ राज्यात सर्वत्र** *रोजगार निर्मिती, दारिद्र्यात घट, जीवनमानाच्या दर्जात सुधारणा, सरासरी विकास उत्पन्न (जी डी पी) यात सुधारणा, स्त्री शक्ती, चांगले शासन आणि जागतिक दर्जाच्या पायाभूत सोयी व्हाव्यात म्हणून* **भारताचे परिवर्तन**

प्रिय भारतीय नागरिक,

परिवर्तनासाठी आम्ही पुढील **कृती योजना** सुचवित आहोत :

### अग्रक्रम १ - मानवी साधनसंपत्तीचा विकास, शिक्षण व प्रशिक्षण

**१.** १००% प्राथमिक क्रियात्मक **साक्षरता** - विस्तृत माहिती पृ. क्र. ९ वर. ४० ते ६० तासात कोणतीही भारतीय भाषा लिहा आणि वाचायला शिका (आठवड्यातून ५ दिवस रोज, फक्त एक तास). जवळ जवळ ६० कोटी लोकांना लिहिणे, वाचणे आणि गणित शिकण्याची आवश्यकता आहे.
**२. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण** - *यामधील विद्यार्थी 'गळण्याचा' दर ९४% टक्क्यावरून १०% पेक्षाही कमी असायला पाहिजे.*
**३. औद्योगिक कौशल्यांचा विकास, (ESD) -** पृ. क्र. ८ व ११ ते १३ पहा. याची सुरवात इयता ९वी, १०वी, ११वी आणि १२वीच्या वर्गापासून व्हायला हवी असे आम्ही सुचवितो. ESD म्हणजे **'औद्योगिकते विषयी आणि वास्तवातील जागतिक व्यवहार कसा आहे'** या विषयीचे स्पष्टीकरण. *भविष्यातील व्यवसायाच्या निवडीसाठी उपयुक्त ठरते.* स्वतःच्या आत्मविश्वासात वाढ होते. यासाठी आठवड्यातून फक्त दोन तास पुरेसे असतात. माध्यमिक शिक्षण पूर्ण असो किंवा नसो अशा कोणत्याही व्यक्तीला हे उपयोगी पडते. मार्कांचा संबंध नाही.
**४. व्यवसायिक शिक्षण व प्रशिक्षण,** (VET) - पृ. क्र. ८ व १० ते १३ पहा. युवकाला कौशल्य, क्षमता आणि (व्यापार) व्यवसाय हे VET मार्फत शिकविले जाते. एखादे काम कुशलतेने करण्यास शिकतो! प्रगत देशातील ९५% युवक I.T. सोडून VET कडे वळतात, जे जगातील GDPच्या १.५% आहे. तसेच भारतातही ५००० प्रशिक्षण केंद्रे आहेत. GDPचे ९८.५% प्रमाण सांभाळण्यासाठी या प्रशिक्षण केंद्रांच्या कौशल्यांची गरज होती.
**५. मुक्त शिक्षण** - सर्वमाध्यमिक आणि तांत्रिक शिक्षणाचे खाजगीकरण. विस्तृत माहितीसाठी पृ. क्र. १२ पहा.
**६. खाजगी व अनिवासी भारतीयांचा (NRI) शिक्षणातील सहभाग** - सरकारने फक्त माध्यमिक शालेय शिक्षण होईपर्यंत पूर्ण लक्ष दिले पाहिजे.
**७. प्रत्येक विभागातील व्यवसायवर्धक संस्था** - राज्यातील प्रत्येक विभागात व्यवसायवर्धक संस्था आहेत. ९७% नवीन रोजगार हा *असंगठीत क्षेत्र आणि SMEमध्ये* आहे. पृ. क्र. १२ पहा.

### अग्रक्रम २ - केंद्र सरकारच्या धोरणातील बदल - आर्थिक आणि औद्योगिक

१. 'लघुउद्योगांवरील आरक्षण' काढून टाकणे. *अशा आरक्षणांमुळे फायद्या ऐवजी तोटेच जास्त होतात.* पृ. क्र. १४, २६ व २८ पहा.
२. कामगार/नोकर यांच्या संबंधीच्या कायद्यात सुधारणा करा. *कार्यक्षेत्रात स्थानिक उद्योगांना दर्जा द्या.* विस्तृत माहितीसाठी पृ. क्र. १४ पहा.
३. **'एस एम ई** (लघुमध्यम उद्योग)' चा अर्थ व महत्व ओळखा. मध्यम (**एम**) व उद्योग (**ई**) यांचे महत्व आपण ओळखले पाहिजे. कारण भारतीय अर्थव्यवस्थेतील **९०%** वाटा हा **एस एम ई** चा असतो तर **७%** हा लघुउद्योगांचा असतो. *हे जाणून वित्तीयसंस्था व व्यापारी व व्यवसायिकांनी त्यांना आधार दिला पाहिजे.*

### अग्रक्रम ३ - सॉफ्टवेअर व माहिती तंत्रज्ञान या बरोबरच निर्यातीशी संबंधित उपक्रम - आर्थिक आणि औद्योगिक

**१. घाऊक व फुटकळ व्यापार**, हा माहिती तंत्रज्ञानाच्या २० पट मोठा आहे. (नोकरी व सरासरी विकास उत्पन्न (जी डी पी) यात खूप मोठी वाढ करणारा)
**२. वस्तु उत्पादन**, एक उद्योग, या दृष्टीने आय टी पेक्षा १८ पट मोठा आहे. (जवळजवळ ७५% सरकारी महसूल यातूनच मिळतो)
**३. स्वास्थ्य रक्षण**, एक उद्योग म्हणून आय टी पेक्षां ५ पट मोठा आहे. (नोकरी व जी डी पी यात मोठी वाढ करणारा)
**४. पर्यटन व प्रवास**, एक उद्योग म्हणून आय टी पेक्षां ९ पट मोठा आहे. (नोकरी व जी डी पी यात मोठी वाढ करणारा)
**५. शिक्षण**, एक उद्योग म्हणून आय टी पेक्षां ५ पट मोठा आहे. (नोकरी व जी डी पी यात मोठी वाढ करणारा) विस्तृत माहिती पृ. क्र. २२, २५, २७ व मलपृष्ठावर, आय टी उद्योग हा जगाच्या जी डी पीच्या केवळ १.५% आहे उरलेल्या ९८.५% कडे आपण लक्ष द्यायला हवे. *वर आर्थिक क्षेत्रातली, केवळ पाच उदाहरणे दिलेली आहेत, आणखीही बरीच आहेत.*

### अग्रक्रम ४ - ३० वर्ष कमी व्याजदराच्या व करमुक्त बाँन्डस्च्या सहाय्याने भांडवलासाठी (५०० अब्ज डॉलर्स) निधीयोजना.

पायाभूत सोयी उपलब्ध करणे. *पायाभूत सोयींसाठी लागणा-या भांडवलासाठी दरसाल ३.५% ते ५% व्याजदराने निधी उपलब्ध व्हावयास हवा.* व या कर्जाची मुदत ३० वर्षापर्यंत असावयास हवी. कारण धंदा/व्यवसाय 'उभा' होण्यासाठी ५ ते १० वर्षे आणि 'खर्च भरुन' येण्यासाठी आणखी ५ ते १० वर्षे लागतात. कृपया पृ. क्र. २३ वरील परिच्छेद ३ विस्तृत माहितीसाठी पहा.

### अग्रक्रम ५ - नेतृत्वदायी आणि चांगले शासन

*नेतृत्वदायी आणि चांगले शासन यांचे फायदे* हे विस्ताराने पृ. क्र. ४ ते ७ आणि १७ ते २२ यावर पहा.

### अग्रक्रम ६ - 'भारताचे परिवर्तन' या आमच्या ३२ पानी पुस्तिकेचा उपयोग करुन ज्ञानवर्धक माहिती मिळविता येते.

संबंधित बाबींची जाणीव, शंकांचे निरंसन आणि उलगडा आणि कृतीयोजन हा आमचा मुख्य उद्देश आहे. आमची पुस्तिका हे त्या दिशेने टाकलेले पाऊल आहे. त्यामध्ये - **नेतृत्व**, **शासन**, **मानवी साधनसंपत्तीचा विकास**, **उद्योग-व्यवसाय** आणि **आर्थिक** या विषयी २४ लेख आणि टीपा आहेत.

ही पुस्तिका **इंग्रजी** बरोबरच **हिंदी**, **उर्दू**, **गुजराती** आणि **मराठी** भाषेतही उपलब्ध आहे. इतर भाषांमध्येही काम चालू आहे. ५% समाज इंग्रजी भाषा समजू शकतो.

अनेक शुभेच्छा,

कृष्ण खन्ना
अध्यक्ष आणि संस्थापक

१५ नोव्हेंबर, २००४

*पुढील क्षेत्रात पूर्ण लक्ष देऊन सुधारणा करा...*

# १. नेतृत्व, २. मानव संसाधन विकास, 3. चांगले शासन, ४. पायाभूत घटक आणि ५. आर्थिक आणि औद्योगिक

**नेतृत्व, मानव संसाधन, शासन, आर्थिक व्यवस्था आणि उद्योग-व्यवसाय हे परस्परावलंबी असतात.**

## अनुक्रम


| | लेखाचे वर्गीकरण | पृष्ठ |
|---|---|---|
| १. *i Watch* — कार्य व उद्दिष्ट | (नेतृत्व) | ४ |
| २. आर्थिक व व्यापारविषयक सुधारणा | (नेतृत्व) | ५ |
| ३. भारतातील शासन व व्यवस्थापन | (नेतृत्व) | ६ |
| ४. भारत देश | (नेतृत्व) | ७ |
| ५. मानवजातीचा सर्वंकष विकास | (मानव संसाधन) | ८ |
| ६. ४० ते ६० तासांच्या आत कोणतीही भारतीय भाषा लिहा-वाचायला शिका | (मानव संसाधन) | ९ |
| ७. व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण - भारताला विजयी करणारा घटक | (मानव संसाधन) | १० |
| ८. औद्योगिक कौशल्यांचा विकास आणि व्यवसायिक शिक्षण यांचे फायदे | (मानव संसाधन) | ११ |
| ९. भारतातील शिक्षणाचा साचा | (मानव संसाधन) | १२ |
| १०. मानव संसाधन विकास - शिक्षण - रोजगार आणि बेकारी | (मानव संसाधन) | १३ |
| ११. भारताचा रोजगारविषयक साचा | (मानव संसाधन) | १४ |
| १२. लोकसंख्येचा स्फोट रोखणे आवश्यक आहे | (मानव संसाधन) | १५ व १६ |
| १३. चांगल्या शासनामुळे भारताचे परिवर्तन एका महाशक्तीत होऊ शकते | (शासन) | १७ |
| १४. चांगले शासन + परिणामकारक व्यवस्थापन = शून्य भ्रष्टाचार | (शासन) | १८ |
| १५. जागतिक दर्जाचा कारभार भारताने का व कसा करावा | (शासन) | १९, २० व २१ |
| १६. भारतासाठी एकसूत्री कृतीयोजना | (शासन) | २२ |
| १७. खरा आणि वास्तविक भारत | (आर्थिक आणि औद्योगिक) | २३ |
| १८. दारिद्र्य रेषा व संबधित माहिती | (आर्थिक आणि औद्योगिक) | २४ |
| १९. जागतिक बाजारपेठेसाठी योजना कशी करावी? - एक फलतक्ता | (आर्थिक आणि औद्योगिक) | २५ |
| २०. लघु-मध्यम उद्योगांचे महत्व | (आर्थिक आणि औद्योगिक) | २६ |
| २१. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताने केंद्रस्थान बनावे | (आर्थिक आणि औद्योगिक) | २७ |
| २२. एस एम ई चे महत्व | (आर्थिक आणि औद्योगिक) | २८ |
| २३. चीन - भारत आर्थिक आणि सामाजिक घटक | (आर्थिक आणि औद्योगिक) | २९ |
| २४. चीन आणि भारत तुलना | (आर्थिक आणि औद्योगिक) | ३० |
| २५. वाचकांसाठी टीपा | (सामान्य) | ३१ |
| २६. जी डी पी मध्ये प्रतिवर्षी १०% वाढ यासाठी कृतीयोजना | (सामान्य) | मागील पृष्ठ |


हे सादरीकरण विशेष करुन भारतीय तरुणांना आणि **३५ वर्षा खालील ७४.२ कोटी भारतीयांना** अर्पण करण्यात येत आहे!

कव्हर वरील डिझाईनचा विषय '**अंधारातून** उजेडाकडे'